| | महाराष्ट्र शासन<br>(विधी व न्याय विभाग)<br>धर्मादाय सह आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>नांदेड विभाग, नांदेड | Govt. of Maharashtra<br>(Law and Judiciary Deptt.)<br>Joint Charity Commissioner,<br>Nanded and<br>Public Trusts Registration<br>Office, Nanded | |
|---|---|---|---|
| जिजामाता धर्मशाळा पब्लीक ट्रस्ट,<br>चौधरी पेट्रोल पंपाजवळ,<br>रेल्वे स्टेशन समोर, नांदेड - ०२<br>दुरध्वनी/फॅक्स ०२४६२-२४९७७० | | Jijamata Dharmashala Public Trust,<br>Near Choudhari Petrol Pump,<br>Opp. Railway Station, Nanded -02<br>Tel./Fax No. 02462-249770 | |
| इ-मेल E-mail-— supdtest.nd-mh@gov.in<br>वेब साईट Web Site- www.mahacharity.gov.in | | | |


जा.क्र. आस्था शाखा/ 621 /२०२५ दिनांक १९.३.२०२५

# निविदा सुचना (दुसरी वेळ)

या कार्यालयाने दिनांक २२.१.२०२५ रोजी वाहन चालक पदावर कंत्राट पध्दतीने नियुक्तीसाठी निविदा सुचना जारी केली होती. तथापी, पुरेशा निविदा प्राप्त न झाल्याने निविदा सुचना पुन्हा नव्याने जारी करण्यात येत आहे. असे जरी असले तरी, दिनांक २२.१.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सुचनेच्या अनुषंगाने ज्या नोंदणीकृत ठेकेदार/कंपनी/संस्थांनी निविदा सादर केल्या आहेत, त्यांनी पुन्हा निविदा सादर करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी याअगोदर सादर केलेल्या निविदेचा पुन्हा नव्याने विचार करण्यात येईल.

मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड कार्यालयासाठी वाहन चालक पदावरील **एक** कर्मचारी कंत्राट पध्दतीने पुरविण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार/कंपनी/संस्थेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

सदरील निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. निविदे सोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकीत असावेत.

२. निविदा धाराकास अस्तीत्वात असलेल्या अनुषांगीक सर्व कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. कंत्राटी वाहन चालकाचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनांची रक्कम प्रचलीत दरानुसार मुख्य मालक म्हणुन या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करुन त्याचा भरणा संबंधित कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. कंत्राटी वाहन चालकाची वयोमर्यादा कमीत कमी १८ वर्ष व जास्तीत जास्त ३८ वर्ष राहील.

५. कंत्राटी वाहन चालकाचे शिक्षण किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे. तसेच, त्यास कमीत कमी पाच वर्षे चार चाकी वाहन चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभुमी असणा-या कंत्राटी वाहन चालकास नियुक्ती देता येणार नाही. कंत्राटी वाहन चालकाच्या नियुक्ती पुर्वी त्यांचे चारित्र्य पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील.

(कृपया मागे पहा)

७. बेशीस्त वर्तन करणा-या कंत्राटी वाहन चालकास या कार्यालयाने निर्देशीत केल्यावर त्वरीत काढुन घ्यावे लागेल.
८. कार्यालयासआवश्यकता असल्यास कंत्राटी वाहन चालकास सुटीच्या दिवशी काम करावे लागेल.
९. कंत्राटी वाहन चालकास नियमाप्रमाणे वार्षिक बोनस देणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.
१०. सदरील कंत्राटी वाहन चालकास अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच, कंत्राटी वाहन चालकाकडुन कार्यालयास / इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
११. नियमीत आस्थापनेवरील कर्मचा-यांस मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी वाहन चालकास देय राहणार नाही.
१२. कुठलेही कारण न देता, कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना असतील.
१३. कंपनी/एजन्सी/ संस्थेतर्फे कंत्राटी वाहन चालकाच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.
१४. निविदा मंजुर झाल्यावर सदरील निविदा प्रक्रीयेस शासनाने मान्यता दिल्यानंतर संबंधीत निविदा धारकास/कंत्राटदारास या कार्यालयाशी करार करावा लागेल. सदरील करार अकरा महिन्यांचे कालावधीसाठी असेल. सदरील निविदा प्रक्रिया शासन मान्यतेवर अवंलबुन असेल.
१५. निविदा अर्ज पांढ-या कागदावर टंकलिखीत करुन कंत्राटी वाहन चालक या पदाच्या सेवेसाठी माणशी दर नमुद करुन सदरील निविदा सुचना प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासुन दहा दिवसांचे आत वरील पत्यावर कार्यालयीन वेळेत बंद लिफ्याफ्यात मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड यांचेकडे सादर करावी. बंद लिफाफ्यावर कंत्राटी वाहन चालक या पदासाठी निविदा असे नमुद करणे आवश्यक आहे. निविदे सोबत संस्था / कंपनी / एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.
१६. सदरील निविदा सुचना https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

10/3/2025
(श्रीमती हिरा कों. शेळके)
धर्मादाय सह आयुक्त,
नांदेड विभाग, नांदेड.

दिनांक :- १०.३.२०२५
स्थळ :- नांदेड

प्रत —
१. कार्यालयीन नोटीस बोर्ड
२. https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळासाठी.